Guest Editor
Dr.V.S.Kanwate

Chief Editor
Dr. Rohidas Nitonde

# The South Asian Academic Research Chronicle

Referred and Indexed E-Journal

ISSN: 2454 - 1109

# Index



| | | | |
|---|---|---|---|
| 45 | IPR' AND COPYRIGHT AWARNESS: AN OVERVIEW | Dr. Paithankar Rajeev R & Miss. Vandana V.Jadhav | 305-311 |
| 46 | बारकोड : ग्रंथालयाकरीता उपयुक्त तंत्रज्ञान | प्रा.गोपाल राजाराम पाटील | 312-318 |
| 47 | बौध्दीक संपदा अधिकार व ग्रंथालय | प्रा. राजेश ब. गोरे & प्रा. सुनील आर. आंबटवाड | 319-324 |
| 48 | बिब्लिओमेट्रिक्स साहित्याचा दर्जा मापन्याचे तंत्र | प्रा. विठ्ठल विश्वनाथ जाधव | 325-328 |
| 49 | माहिती साक्षरता काळाची गरज | प्रा. अनिल आनंदराव जेवळीकर & प्रा. विलास गोपीनाथराव किर्दत | 329-332 |
| 50 | दि. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा: २०१६ ग्रंथपाल व ग्रंथालयाचे अधिकार आणि जबाबदारी | संतोष किर्तनकार | 333-336 |
| 51 | बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या माहिती साक्षरता या कौशल्याचा शोध एक अभ्यास | प्रा. महादेव नागनाथ चव्हाण | 337-350 |
| 52 | Information literacy - माहिती -साक्षरता | जाधव मारोती बालाजी | 351-355 |
| 53 | नांदेड व बीड जिल्हयातील अनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयात सिक्स सिग्मा या तंत्राचा प्रभाव : तुलनात्मक अभ्यास | श्री. धनंजय एल. मोतेवार & डॉ. सौ. शालीनी एम. साखरकर & डॉ. भरत आर. लोकलवार | 356 - 359 |
| 54 | शरदचंद्र पवार ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय तरोडा (ना.) नांदेड येथे सादर झालेल्या एम. एल. आय. एस. सी. लघुशोध प्रबंधाचा बिब्लीओमेट्रीक्स अभ्यास. | डॉ. पवार जी. आर. | 360- 364 |
| 55 | माहिती साक्षरता | प्रतिभा लक्ष्मण वराडे | 365- 369 |
| 56 | उल्लेख विश्लेषन (Citation Analysis) | दत्तराम रामजी रगडे | 370- 374 |
| 57 | ग्रंथालयात माहितीसाक्षरतेची गरज | प्रा.डॉ.काशिनाथ रामा राठोड | 375- 377 |
| 58 | ''स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित महाविद्यालयातील विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांच्या वाचन विषयक सवयी / संस्कृती : एक अभ्यास'' | श्री सिद्दीकी नईम अहमद & डॉ. सौ. शालिनी एम. साखरकर | 378- 380 |
| 59 | माहिती साक्षरता एक गरज | प्रा. सोळंके दत्ता सोपानराव | 381- 384 |



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

The South Asian Academic Research Chronicle
ISSN 2454 - 1109
A Peer Reviewed Refereed and Indexed International Inter Disciplinary Open Access Monthly e-Journal

# माहिती साक्षरता काळाची गरज

प्रा. अनिल आनंदराव जेवळीकर
ग्रंथपाल,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
बार्शी, जि. सोलापूर

प्रा. विलास गोपीनाथराव किर्दंत,
ग्रंथपाल,
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर,
ता. अंबाजोगाई, जि. बीड

**सार**

माहिती साक्षरता ही कल्पना अतिशय व्यापक आहे. ग्रंथालयातील वाचकांना आवश्यक माहिती प्राप्तीचे कौशल्य शिकवणे हा यामागचा हेतु आहे. ग्रंथालयात येणारा प्रत्येक वाचक माहिती साक्षरतेमुळे नवीन संकल्पना, तंत्र आत्मसाद करू शकेल. माहिती साक्षरतेमुळे ग्रंथालयीन वाचकांच्या क्षमता विकसित होण्यास मदत होत असते. यासाठी ग्रंथालयानी माहिती साक्षरता प्रशिक्षण, विस्तार सेवा यासारखे कार्यक्रम राबवले पाहिजेत.

**प्रास्ताविक :**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती ही विविध मार्गांनी व विविध स्वरूपात मुबलकपणे उपलब्ध होत आहे. त्या माहितीतून नेमकी माहिती मिळवणे व ती योग्य प्रकारे वापरणे, यासाठी विशेष कौशल्याची गरज भासत आहे. माहिती साक्षरता क्षमता या नवीन संकल्पनेकडे या समस्येवर उपाय म्हणून पाहिले जात आहे. विशेषतः इंटरनेटच्या उपलब्धतेमुळे माहिती साक्षरतेस आणखी महत्व प्राप्त झाले आहे.

माहिती साक्षरतेचे शैक्षणिक अभ्यासक्रम अमेरिकेत 1980 पासून तयार केले जात आहेत. माहिती साक्षरता ही संकल्पना म्हणजे पूर्वी शैक्षणिक ग्रंथालयातून शिकवल्या जाणाऱ्या सुचियुक्त अभ्यासक्रमाचे आधुनिक स्वरूप म्हणता येईल. कोणत्याही शैक्षणिक संस्थेसाठी माहिती साक्षरता ही प्रमुख शैक्षणिक कृती ठरते. माहिती साक्षरता कार्यक्रम हा माहितीचा एक शक्तीशाली उपक्रम आहे. अभ्यासक्रमात वेगवेगळे कार्यक्रम आणि सेवा देताना एवढेच नव्हे तर ग्रंथपाल आणि व्यवस्थापक यांना सुध्दा माहिती साक्षरता कार्यक्रमाची मदत होते.

The South Asian Academic Research Chronicle



Created with nitro PDF professional

The South Asian Academic Research Chronicle
ISSN 2454 - 1109
A Peer Reviewed Refereed and Indexed International Inter Disciplinary Open Access Monthly e-Journal

माहिती साक्षरता म्हणजे एक अशी कला की ज्यात संगणकाचा वापर कसा करावा आणि त्या माध्यमातून माहितीचे वेगवेगळे पैलू तांत्रीक, सांस्कृतिक, तात्वीक आणि त्यांचा प्रभाव जाणने म्हणजे माहिती साक्षरता होय. माहिती तंत्रज्ञान ही संकल्पना अनेक वर्षाच्या मेहनतीने उदयास आली. ग्रंथपालानी संगणक, नियतकालिके आणि साहित्यांचा वापर त्यांच्या ग्रंथालयात करावा यासाठी आस्तीत्वात आली. कोणत्याही ग्रंथालयात माहिती साक्षरता कार्यक्रम राबविण्यापूर्वी त्यांची माहितीची गरज आपल्याला समजून घेणे महत्वाचे ठरते.

**ग्रंथालयात माहिती साक्षरतेची गरज :**

ग्रंथालयात विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक व सामान्य वाचक महत्वाचे घटक असतात. या घटकांना ग्रंथालयाची गरज असतेच, जसे विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन कार्यासाठी, शोधपेपर प्रसिध्द करणे आणि त्यांच्या विषयासंबंधी जाणून घेणे यात रूची असते तर शिक्षकाला वर्गात शिकविण्यासाठी नवनवीन संदर्भीय साहित्याची गरज असते. यासाठी खालील महत्वपुर्ण घटकांचा समावेश होतो.

1. नवीन ज्ञानाचे सामान्यीकरण
2. बैठका आणि कार्यशाळेत सहभाग
3. उत्सुकतेतून नवीन माहितीची निर्मिती करणे
4. पुस्तके लिहीणे
5. रोजच्या घडामोडीची माहिती
6. आंतरजाळ्याच्या माध्यमातून नवनवीन साहित्य निर्मीती, जागतिक ग्रंथालय यातून तात्काळ माहिती मिळविणे इ.

**माहिती साक्षरता कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये :**

माहिती साक्षरता ही आयुष्यभर शिक्षण यावर आधारित आहे. ही शाखा सर्वशिक्षण पर्यावरणाला आणि शिक्षणाच्या सर्व स्तरांना उपयोगी आहे. त्याचे उद्देश खालील प्रमाणे-

1. विद्यार्थ्यांला प्राप्त माहितीचा उपयोग त्याच्या दैनंदिन जीवनात करता येणे.
2. विद्यार्थ्याला आर्थिक, न्यायीक, सामाजिक गोष्टींचा सारासार विचार करता येण्यासाठी मदत करणे.
3. प्राप्त झालेल्या माहितीचे योग्य व प्रभावीपणे वापर करता येणे.

The South Asian Academic Research Chronicle


Created with nitroPDF professional

The South Asian Academic Research Chronicle
ISSN 2454 - 1109
A Peer Reviewed Refereed and Indexed International Inter Disciplinary Open Access Monthly e-Journal

4. आपणास हवी असलेली माहिती आणि तिची मर्यादा अवलोकीत करणे.
5. विद्यार्थ्यांना केंद्र मानून माहितीच्या शोधात मदत करणे.

**माहिती साक्षरता कार्यक्रम लागु करण्याचे मार्ग :**

1. ग्रंथालयाची माहिती देणारी पुस्तिका प्रकाशित करणे आणि वाचकामध्ये वितरीत करणे.
2. ग्रंथालयातील साधने, सेवा यांची माहिती देण्यासाठी व्याख्यानांचे आयोजन करणे.
3. ग्रंथालयात माहिती संग्रहीत करण्यासाठी दृकश्राव्य साधनांचा सीडी, टेप, स्लाईड शो इ. चा उपयोग करणे. त्याचप्रमाणे त्यातून माहिती कशी शोधावयाची त्याची प्रत्यक्ष माहिती देणे.

**ग्रंथालयातील माहिती साक्षरतेतील विविध घटक :**

ग्रंथालयात माहिती साक्षरता कार्यक्रम राबवितांना त्यामध्ये खालील घटकांचा समावेश करण्यात येतो.

1. ग्रंथालयाचा उपयोग करण्याविषयीची माहिती देणे.
2. स्पर्धात्मक परीक्षा आणि व्यावसाय मार्गदर्शन करणे.
3. ग्रंथालयातील सेवा या विषयीची माहिती देणे
4. चालू घडामोडी विषयीचे ज्ञान प्राप्त करून देणे.
5. लेखन वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे.
6. चालु घडामोडीची माहिती देण्यासाठी नियतकालिके आणि वर्तमानपत्रे यांचे महत्व पटवून देणे.
7. वाचकांना त्यांच्या संशोधनासंबंधी माहिती देण्यास ग्रंथालय तत्पर आहे हे पटवून देणे.
8. आंतरजाळ (इंटरनेटचा) वापर कसा करावा व आंतरजाळ (इंटरनेट) वरून माहिती कशी मिळावावी या विषयी माहिती देणे.

इ. कार्य माहिती साक्षरता कार्यक्रमांअंतर्गत करावी लागतात. माहिती साक्षरता कार्यक्रमामुळे महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचकांना मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळते.

**माहिती साक्षारता कार्यक्रम महाविद्यालयात राबविल्यामुळे विद्यार्थ्यांना होणारे फायदे :**

1. विद्यार्थ्यांना हवी असलेली माहिती त्यांना पाहिजे त्यावेळी पाहिजे त्या स्वरूपात उपलब्ध करून दिल्या जाऊ शकते.
2. विद्यार्थी वर्गासाठी स्पर्धा परिक्षा, नोकरी विषयक माहिती, स्वयंरोजगाराविषयी माहिती मिळते.

The South Asian Academic Research Chronicle



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

The South Asian Academic Research Chronicle
ISSN 2454 - 1109
A Peer Reviewed Refereed and Indexed International Inter Disciplinary Open Access Monthly e-Journal

3. लघुउद्योग व कुटीर उद्योग, शेती विषयक तंत्रज्ञान याविषयी माहिती मिळविण्यास विद्यार्थी सक्षम बनू शकतो.
4. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाबद्दल, ग्रंथालय सेवांची, संदर्भ ग्रंथाची, ग्रंथालय साहित्यांची व ग्रंथालयाच्या विविध उपक्रमांची माहिती मिळेल.
5. प्रत्येक विषयातील नवीनतम माहिती मिळेल तसेच वर्तमानपत्रातील, नियतकालिके, संदर्भ ग्रंथातील माहिती चा उपयोग कशा पध्दतीने करावा याचे ज्ञान मिळेल.
6. भावी जीवनातील जबाबदाऱ्या समर्थपणे पेलण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.
7. ग्रंथालयीन माहिती तंत्रज्ञानाच्या वापरातून जबाबदार नागरिकांचा समुह तयार होईल.

ग्रंथालयाचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करण्याच्या दृष्टीने वाचकांना मार्गदर्शन आणि मदत करणे होय. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानांसंबंधीत जिज्ञासा जागृत करून ती प्राप्त करून ती प्राप्त करण्यासंबंधी प्रोत्साहन देवून त्याला क्रियाशिल करणे त्यामधील कौशल्ये, बौध्दीक सामर्थ्य वाढविणे, जीवनाबद्दलचे योग्य दृष्टीकोण मांडण्यासाठी तसेच वाचकांचा बौध्दीक स्तर उंचावून त्याच्या व्यक्तीगत विकासाला पोषक वातावरण निर्माण होईल व इतर विषयातील मुलभूत आणि अद्यावत ज्ञान सखोलपणे प्राप्त करण्यास मदत होईल.

**संदर्भ :**

1) फडके द. ना. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन, 2007.
2) Bibwal, J. Information Seeking Behavior & Behavior & User. New Delhi : Ess Ess Pub 2002.
3) http:/wikimediafoundationg. org.
4) पाध्ये शरद, 2007 माहिती साक्षरता काळाची गरज, अमरावती : एल.आय.एस.स्टडी, सर्कल सेमिनार.

The South Asian Academic Research Chronicle



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional